

मुख्यमंत्री एकनाथ शिंदे मेट्रो-३ भुयारी मार्गाची पाहणी करताना

# भुयारी मेट्रोचे ९० टक्के काम पूर्ण

## डिसेंबरअखेर आरे ते बीकेसी टप्पा पूर्ण होणार ● मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची माहिती

◆**मुंबई ।** मेट्रो-३चा (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) ३३.५ किमी लांबीचा भूमिगत मार्ग जवळपास ९० टक्के पूर्ण झाला असून डिसेंबर २०२३ अखेर मेट्रो-३चा पहिला टप्पा (आरे ते बीकेसी स्थानक) पूर्ण होईल, अशी माहिती मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी बुधवारी दिली. मुंबई शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी सर्वोत्तम सार्वजनिक वाहतूक व्यवस्था असणे गरजेचे आहे. मेट्रो रेल्वेच्या माध्यमातून मुंबईकरांची ती गरज पूर्ण होणार आहे, असेही त्यांनी सांगितले. एकनाथ शिंदे यांनी मंगळवारी रात्री उशिरा मुंबई मेट्रो-३च्या चर्चगेट ते विधान भवन या भुयारी मार्गाची पाहणी केली.

मुंबई मेट्रो मार्ग-३ (कुलाबा-वांद्रे-सिप्झ) हा मुंबईसाठी पहिला पूर्णपणे भूमिगत मेट्रो मार्ग आहे. शहरातील वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी तसेच वाहतुकीच्या पर्यायी सुविधेसाठी हा मार्ग असून त्याचे काम प्रगतिपथावर आहे. यामुळे वाहतुकीचा ताण मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. मेट्रोमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य देण्यात आले आहे. अतिशय अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून हवा, ध्वनी प्रदूषण होणार नाही याची काळजी घेण्यात आल्याचे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### कुलाबा-वांद्रे-सिप्झ मेट्रो-३ प्रकल्प

**या मार्गावर २७ स्थानके असून त्यापैकी २६ भुयारी, तर १ जमिनीवर आहे.**

**या मार्गामुळे प्रमुख व्यवसाय आणि रोजगार केंद्रे, रुग्णालये, शैक्षणिक संस्था, धार्मिक स्थळे, मनोरंजनाच्या सुविधा तसेच उपनगरीय रेल्वेशी न जोडलेल्या काळबादेवी, गिरगाव, वरळी, आंतरराष्ट्रीय आणि देशांतर्गत विमानतळांसारख्या भागांना जोडणी मिळेल.**